**दिनांक : २२ - ०८ - २०२६**

**विषय : चालू असलेल्या कोर्ट केसेस च्या संदर्भात.**

सभासद बंधू भगिनींनो,

परवा २० ऑगस्ट रोजी आपल्या सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या संदर्भात ज्या तीन कोर्ट केसेस चालू आहेत त्या पैकी दोन केसेस ची सुनावणी सहकारी न्यायालयात होती.

सोसायटी ने आपल्या पाच सभासदान विरुद्ध त्यांच्या सदनिका रिकाम्या करण्या करिता केस केली आहे. त्यात श्री सुवर्णकांत ठाकोर यांनी १५ , ऑगस्ट, २६ रोजी त्यांच्या सदनिकेचा ताबा बिल्डर कडे दिला आहे. ते कोर्टा ला कळविण्यात आले. दोन सभासदांनी, सुवर्णा दीक्षित आणि फहीम कोतवाल, यांनी सदनिका सोडण्यासाठी, व्यक्तिगत कारणांमुळे, कोर्टा कडून काही दिवसांची मुदत मागून घेतली म्हणून माननीय कोर्टा ने पुढील सुनावणी साठी ९ सप्टेंबर, २०२६ अशी तारीख दिली आहे.

विशेष म्हणजे टाकळकर - कारखानीस यांची केस, सुवर्णा दीक्षित यांची केस आणि सदनिका रिकाम्या करण्या साठी ५ सभासदांवर सोसायटी ने केलेली केस अशा ह्या तिन्ही केसेस ची सुनावणी ९ सप्टेंबर ला एकत्रित अशी होणार आहे.

पंच समितीच्या वतीने